सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**

**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक ०५/०१/२०२४

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.विसयो-०४२३/ प्र.क्र.११५/ पोल-७ दिनांक ०४ जानेवारी, २०२४.

**विषय :-** केंद्र शासनाकडून राज्यास भांडवली खर्चासाठी कर्ज स्वरुपात विशेष सहाय्य योजना (बिनव्याजी कर्ज) भाग-५ अंतर्गत प्रशासकिय मान्यता प्रदान तसेच निधी वितरण करण्याबाबत...

******

**परिपत्रक -**

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र. विसयो-०४२३ / प्र.क्र.११५ / पोल-७, दिनांक ०४ जानेवारी, २०२४. ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४०१०४१८३६०६६३२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

अपर पोलीस महासंचालक (नियोजन व समन्वय), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत,

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके मध्ये " वित्त व लेखा " या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

केंद्र शासनाकडून राज्यास भांडवली खर्चासाठी कर्ज स्वरुपात विशेष सहाय्य योजना (बिनव्याजी कर्ज) भाग-५ अंतर्गत प्रशासकिय मान्यता प्रदान तसेच निधी वितरण करण्याबाबत...

# महाराष्ट्र शासन

**गृह विभाग,**

**शासन निर्णय क्र. विसयो-०४२३/प्र.क्र ११५/पोल-७**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय मुंबई-४०००३२

दिनांक : ४.०१.२०२४.

**संदर्भ :-**

१. वित्त विभाग, शासन पत्र क्र. संकीर्ण -२०२३/प्र.क्र.०९/अर्थबळ, दि.१२.०४.२०२३.
२. Letter of Government of India, Ministry of Finance, F. No. ४४(१)/PF-S/२०२३-२४(CAPEX) दि.०२/०५/२०२३.
३. Letter of Government of India, Ministry of Finance, F. No. ४४(१)/PF-S/(CAPEX) २०२३-२४ दि.२९/०९/२०२३
४. समक्रमांकाचा शासन निर्णय दिनांक २,मे,२०२३
५. शासन निर्णय क्र. विसयो-०४२३/प्र.क्र ११५/पोल-७ दि.०१/०८/२०२३.
६. केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालयाच्या, Department of Expenditure चे पत्र क्र. ४४(१)/PF/-S/(CAPEX) Part-V/२०२३-२४, Date १०.०८.२०२३.

**प्रस्तावना:**

केंद्र शासनाच्या भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य योजनेंतर्गत राज्यास उपलब्ध होणारे ५० वर्ष मुदतीचे बिनव्याजी कर्ज, सन २०२३-२४ मध्ये उपलब्ध होणार आहे. सदर योजनेतील भाग-५ (Housing for Police personnel above or as part of Police Station in urban areas ) अंतर्गत महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाने प्रकल्पनिहाय गृह विभागामार्फत प्रस्ताव पाठविण्यात आले होते. सदर प्रकल्पास केंद्र शासनाच्या दि. १०.०८.२०२३ रोजीचे पत्रान्वये मंजूरी प्राप्त झाली असून, या प्रकल्पासाठी केंद्र शासनाने रु.२३३.०० कोटी कर्ज मंजूर केले आहे. सदर मंजुर निधीपैकी केंद्राने वितरीत केल्यानुसार ५०% रकमेचा पहिला हप्ता रु.११६.५० कोटी निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय -**

केंद्र शासनाच्या भांडवली खर्चासाठी विशेष सहाय्य योजनेंतर्गत २०२३-२४ या योजनेच्या भाग-५ (Housing for Police personnel above or as part of Police Station in urban areas ) अंतर्गत केंद्र शासनाने मंजुर केलेल्या, रु. २३३ कोटी निधीपैकी सन २०२३-२४ या चालू वित्तीय वर्षातील अर्थसंकल्पीय तरतूदीमधून पहिल्या हप्त्याचा निधी रु.११६,५०,००,०००/- (अक्षरी रुपये एकशे सोळा कोटी पन्नास लाख फक्त ) महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ यानां वितरीत करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे

२. वितरीत केलेला निधी “मागणी क्रमांक बी-१०, ४०५५- पोलीसांवरील भांडवली खर्च, ००-२०७ राज्य पोलीस, (०१) केंद्र शासनाकडून राज्यांना भांडवली गुंतवणूकीसाठी विशेष सहाय्य योजनेंतर्गत बिनव्याजी कर्ज (०१) (०२) भांडवली गुंतवणूकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य योजना २०२३-२४ अंतर्गत (योजना भाग-५) (शहरी) पोलीसांच्या प्रशासकीय इमारती व निवासी बांधकामे (केंद्र हिस्सा १०० %) - ४०५५०६९१ (कार्यक्रम), ५३-मोठी बांधकामे या लेखाशिर्षाखाली सन २०२३-२४ मधील मंजूर केलेल्या अर्थसंकल्पीय तरतूदीतून खर्ची घालण्यात यावा..

३. उपरोक्त लेखाशिर्षाखालील निधी आहरित करण्यासाठी कक्ष अधिकारी (रोख शाखा) गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी, तसेच उपसचिव, रोखशाखा, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. उपरोक्त नमूद करण्यात आलेली रक्कम रु. ११६.५० कोटी (अक्षरी रुपये एकशे सोळा कोटी पन्नास लाख फक्त ) आहरण व संवितरण अधिकारी यांनी कोषागारातून आहरीत केल्यानंतर प्राप्त निधी महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ यांना प्रदान करण्यासाठी, खालील एसएनए खात्यावर देण्यात यावा. सदरचे निधी वितरण हे बिनशर्त स्वरुपाचे आहे. या योजनेसाठी Single Nodal Agency (SNA) खात्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे:-

**योजनेचे नाव** - केंद्र शासनाच्या भांडवली खर्चासाठी विशेष सहाय्य योजनेंतर्गत २०२३२४- या योजनेच्या भाग-५ (Housing for Police personnel above or as part of Police Station in urban areas )

Account Name: Part V HSG FOR POLICE PERSONAL ABOVE OR PART OF POLICE STATION IN URBAN AREA

ACCOUNT number: ६०४५५०००७३

IFSC CODE: MAHB०००१३८८

BANK NAME : BANK OF MAHARASHTRA, Mantralaya, Branch.

५. केंद्र शासनाच्या राज्यांना भांडवली खर्चासाठी विशेष सहाय्य (बिनव्याजी कर्ज) योजनेच्या भाग-५ अंतर्गत वितरीत करण्यात आलेला निधीसंदर्भात, खर्चमेळाची जबाबदारी महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाची राहील. तसेच महालेखापाल यांनी विहित केलेल्या नमुन्यात लेखे ठेवावेत.

६. केंद्र शासनाने ज्या प्रकल्पांसाठी निधी मंजुर केला आहे, त्याच प्रकल्पांसाठी / प्रयोजनासाठीच निधी खर्च होईल, याची महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ यांनी खबरदारी घ्यावी. अशा खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र वेळोवेळी शासनास सादर करणे बंधनकारक राहील.

७. सदर रक्कम वितरीत झालयानंतर या रक्कमेतून खर्च केलेलया रक्कमांचा तपशील प्रत्येक

तीन महिन्याला केंद्र शासनास, Ministry of Finance च्या संबंधित विभागास, तसेच राज्य शासनास सादर करावा. तसेच लेखापरिक्षणासाठी शासनास/शासनाने नियुक्त केलेल्या यंत्रणेस उपलब्ध करून देण्यात यावा.

८. केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालयाने निर्गमित केलेल्या दि. ६.४.२०२२, दि.६.७.२०२२ व दि.१६.१२.२०२२ रोजीच्या व वेळोवेळी मार्गदर्शक सूचना विचारात घेवून प्रकल्पनिहाय वितरीत करण्यात आलेला निधी खर्च करावा. तसेच राज्य शासनाच्या संदर्भ क्र. ५ येथील दि. १.०८.२०२३ अन्वये दिलेल्या सूचनांचे पालन करणे बंधनकारक आहे

९. सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. २६०/का.१४६१, दिनांक २६.१२.२०२३ व वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. ६८३/२०२३ दिनांक २९.१२.२०२३ अन्वये प्राप्त झालेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

१०. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक २०२४०१०४१८३६०६६३२९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

NARAYAN BIRA MANE

Digitally signed by NARAYAN BIRA MANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT,
2.5.4.20=1dfb457576797050f19aafaa495673fc843c789942459cd39fc5561071b4a70c, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=79C09BA352C5B3E65B259113F1CDCFAB29FB961D4EA9A24411D7F622D2ED20BF, cn=NARAYAN BIRA MANE
Date: 2024.01.04 18:35:38 +05'30'

**( नारायण बि. माने )**
**अवर सचिव, गृह विभाग.**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन मुंबई
२. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा.उपमुख्यमंत्री (गृह), महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा.उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन), महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
६. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
७. प्रधान सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
८. प्रधान सचिव (बांधकाम), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई,
९. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
१०. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई.

११.पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मुंबई

१२.महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखा व अनुज्ञेयता /लेखा परीक्षा), मुंबई.

१३.महालेखापाल, महाराष्ट्र-२, (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), नागपूर

१४.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,

१५.अधिदान व लेखाधिकारी, मुंबई

१६.कार्यासन अधिकारी (व्यय-७/अर्थ-११/अर्थबळ/ ऋण व हमी) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,

१७.कक्ष अधिकारी (अर्थ-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.

१८.कार्यासन अधिकारी, का. १४६१, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.

१९.व्यवस्थापक, बँक ऑफ महाराष्ट्र, मंत्रालय शाखा, मुंबई

२०.निवड फाईल (पोल-७).